# वेडोबांची जत्रा : भाग तिसरा

## गाणारं पाणी

स्पॅनिश खेडं बघताना डोंगरावरून खालचं बार्सिलोना सुंदर दिसत होतं. त्यात एक भलीमोठी प्रासादवजा इमारतही अगदी जवळच असल्याचं कळत होतं. ‘हे काय आहे कोण जाणे. कुणाला विचारणार? पुन्हा स्पॅनिशची अडचण.’ असं म्हणत म्हणत, ध्वनिफीत सांगत होती तेवढं ऐकत गेलो. नवरा म्हणाला होता तसाच भरपूर वेळ मोडला हे मात्र खरं. सव्वासात कधी वाजले कळलेच नाहीत. मग कॉफी प्यायची इच्छा झाली. पायही दमले. म्हणून पुन्हा चौकात आलो. पण तोवर साऱ्या खाणावळी बंद झाल्या होत्या. पुन्हा वर जाऊन छोटी मेट्रो घ्यायची की शोधून काढून बरोबर बस घ्यायची हे ठरवताना नवऱ्याला लहर आली,



डोंगरावरून दिसणारा राजवाडा

"अग, सारं कसं हिरवंगार, सुंदर आहे. हवा सुध्दा छान आहे. पायीपायी उतरून जाऊया, चल." दुखरे पाय विसरून मजेत रमतगमत खाली येतायेताच मघापासून वरून दिसणारा तो प्रासाद परत उजवीकडे दिसला. त्याच्या समोरच्या प्रांगणात नानाविध कारंजी होती. शिवाय डावीकडे रस्त्यावरसुध्दा कारंज्यांची रांगचरांग होती. त्यापलीकडे रस्त्याच्या दुतर्फा दोन उंच खांब होते. मी या कारंज्यांबद्दल वाचलं होतं. तेव्हा उजवीकडच्या पायऱ्या चढून, वरच्या प्रांगणात जाऊन सारं एकदा नीट पहावं म्हणून वर चढलो. वर कॉफी आणि बिकिनी मिळत होते. जरासं विसावल्याबरोबर पायांनी बंड पुकारलं होतं. म्हणून तिथल्याच एका रुंद पायरीवर टेकलो. दोन्हीकडे क्षितिजापर्यंत पसरलेली थुईथुई कारंजी पाहून डोळे निवले. कॉफीने तकवा आला. पायही जरा खुशालले.



थुई थुई नाच..

"आठ वाजले; आताउठावं."

म्हणत उभे राहिलो आणि एकाएकी त्या चौकात बेथोवनची नववी सिंफनी घुमली. प्रांगणाच्या मधोमध असलेल्या सर्वात मोठ्या, भव्य कारंज्याचं रूपच बदललं. साथीच्या संगीतसाखळीचे (medley) भाव बदलत गेले; नवरसांची आवर्तनं झाली. त्याच्याशी जुगलबंदी करत त्या कारंज्याने अगदी नृत्यनाट्य (ballet) सादर केलं. कधी वाऱ्यावर डोलणाऱ्या हिरवळीची लवलव, कधी हंसांच्या पंखांची फडफड, कधी शेकडो युवतींचं कमनीय



आबाला भिडतंय पानी

सांघिक नर्तन, कधी वादळवाऱ्यात, झंझावातात वृक्षांच्या डोलाऱ्याची होणारी पिसाट गद्‌गद्, कधी रौद्रगंभीर गगनचुंबी लाटांचं तांडव तर कधी आभाळापर्यंत उभं ठाकलेलं वेगवेगळ्या घनतेच्या स्थिर ढगांचं श्वेतपटल. उन्हं चढताच दाट धुकं विरावं तसं हे घनदाट पटल अगदी क्षणार्धात विरून जाई आणि उरे ती अगदी भुईलगतची पाणसर्पांची सळसळ. बरोबरची सुरांची साथ जणू या नृत्यनाट्याचा पडसादच असल्यासारखी, सारे आभास अधिकच नाट्यमय करणारी होती. भोवताली, त्या विस्तीर्ण प्रांगणात, हजार एक माणसं जमली होती. यात युवकयुवतींचा भरणा अधिक होता. स्पॅनिश तरुणी गहूवर्णी, काळ्या केसांच्या आणि जांभळ्या-निळ्या डोळ्यांच्या! ही रंगसंगती सुंदर दिसते पण प्रथमदर्शनी एक सुखद धक्का देते. समोरचा स्वर्गीय देखावा पहात असतानाच तो तन्मयतेने पाहणाऱ्या या अप्सरांकडे पुन्हापुन्हा पाहण्याचा मोह मला म्हातारीलासुध्दा आवरत नव्हता. तरुणांची अवस्था तर 'कोणता पाहू नीलिमा' अशीच होती. मध्येच संगीताच्या एका खट्याळ तुकड्याशी संगनमत करून कारंज्याच्या जलपऱ्यांनी काही शिंतोडे या नीलपऱ्यांच्या गालांओठांवर असे उडवले की त्या स्वतःच्याही नकळत अत्यंत मोहक लाजल्या.  हा जादूचा खेळ पाऊण तास चालला. खेळ संपल्यावर बराच वेळ कुणाला उठण्याचं भानच नव्हतं. मग अगदी हळूहळू गर्दीला जाग आली; थोडी पांगापांग झाली. काहीजण मात्र दुर्दम्य आशेने , पुन्हा जंतरमंतर सुरू होईल म्हणून वाट पहात तसेच बसून राहिले. नऊ वाजत आले होते. उशीर झाला, दमायलाही झालं म्हणून आम्ही घरी निघालो,

"आजचा दिवस वस्सूल झाला. आता घरी जाऊन झोपूया", असं म्हणत.

## रंगली रजनी अशी

हॉटेलवर पोचलो तर दारातच गेल्या दोन दिवसात मिळालेली एक ऑस्ट्रियन मैत्रीण, इसाबेला, आम्हाला पाहून चीत्कारली,

"कुठे होता तुम्ही? मी वाटच बघत होते. मी आज रात्रीची फ्लॅमेंकोची घाऊक तिकिटं काढली

आहेत, आता फक्त दोनच जागा शिल्लक आहेत. त्यासुध्दा मी तुमच्यासाठी राखून ठेवायला धडपडले आहे म्हणून!"

पायांची दुखणीबिखणी किती मानसिक असतात ते त्या क्षणी कळलं.अगदी खोलीवरसुध्दा न जाता तसेच निघालो. बाहेर जोरदार पाऊस पडायला लागला होता. टॅक्सी मिळेना. पण इसाबेलाने मेट्रोचं स्टेशनही सांगितलं होतं. तेव्हा तिला दुप्पट दुवा देत पळापळ केली. बयेने आमच्यासाठी राखून ठेवलेल्या जागाही अगदी मोक्याच्या, स्टेजला चिकटून होत्या. येवढ्या चिकटून की मी पर्स स्टेजवर ठेवली आणि पाय स्टेजखाली पसरले!

## कथ्थक नाटक मंडळी

फ्लॅमेंको हा स्पॅनिश लोकनृत्याचा प्रकार आहे असं ऐकलं होतं. इथे ना पडदा होता ना देखावा. दाटीवाटीने ठेवलेल्या प्रेक्षकांच्या खुर्च्यांना चिकटूनच अगदी साधा लाकडी मंच होता. त्याच्यावर चपट्या टोप्या आणि मळलेल्या तंग काळ्या तुमानी घातलेले पाचसहा कामगार होते. हे लोक चिपळ्या-तुणतुण्यांसारखी काही वाद्यं आणि एक गिटार इकडेतिकडे हालवत होते. बराच वेळ झाला तरी हे कामगार तिथून हालेचनात. प्रेक्षकात जरा चुळबूळ सुरू झाली. इतक्यात त्यांच्यातल्याच एकाने दमदार आवाजात गायलाच सुरुवात केली. ना अनाउन्समेंट ना तिसरी घंटा. गाण्याची पध्दत अगदी आपल्या नाट्यसंगीताची. या गाण्याला संवादाची फेक होती. जणू त्याला प्रत्युत्तर करावं अश्या थाटात आतून आणखी एक तस्साच मळका-फाटका इसम बाहेर आला आणि गाणाऱ्यासमोर स्थिरावला...म्हणजे, त्याचं शरीर स्थिरावलं. पण त्याचे पाय मात्र आपल्या कथ्थक-भरतनाट्यम्च्या थाटात, अत्यंत जलद आणि तालबध्द नाचत होते.नाचासोबत घुंगरांची छुमछुम नव्हती तर लाकडी फरशीवरची बुटांची टपटप, ठकठक, कडकड तर कधी कडकडाटच होता. आणि त्याच्यासोबत नाचत होते ते त्याच्या चेहऱ्याचे स्नायू. मनातला भावनांचा उद्रेक अत्यंत निग्रहाने ताब्यात ठेवल्यावर जसा दिसेल तसा कल्लोळ त्या चेहऱ्यावर संयत केला जात होता. त्याचा पदन्यास आणि भावमुद्रा आधीच्या संगीताच्या सवालाला जणू जबाब देत होते.



वेष असावा बावळा

मग एका काळ्याच कपड्यातल्या बाईने प्रवेश केला. ही दोघं पाळीपाळीने संगीताच्या तुकड्यांना नृत्योत्तरं देत गेली. संवाद चालू राहिला. गोष्ट पुढे गेली. डोळे मिटले तर मन किर्लोस्कर नाट्य मंडळीच्या काळात जाऊन पोचत होतं. 'वद जाऊ कुणाला शरण' मधला, 'ते घडले व्यर्थऽऽऽ साऽऽऽचे'तला हतबल गहिवर सतत जाणवत होता; मनाचा गाभा हेलावून टाकत होता. पायांवर, चेहऱ्यावर लक्ष केंद्रित केलं तर षण्मुखानंद हॉलमधली सितारादेवी आठवत होती. आणि कपडे बघितले की मात्र मुंबईच्या नाक्यावरचं टपोरी टोळकं अगदी ओळखीचं वाटत होतं. मग तसेच आणखी एकदोघे आले. कुणी उत्कट नाचले; कुणी आर्त गायले आणि निघून गेले.

## झुलव पिसारा नाऽच

आणि मग लाल रंगाचा, झुलीझुलीचा पायघोळ झगा घालून आणि तशीच लाल शाल पांघरून एक नवयौवना आली. इथून पुढे या संगीतनाटकाला सर्वार्थाने रंग चढला. गाण्यातली, पदन्यासातली, भावमुद्रांतली उत्कटता आता शिगेला पोचली. तिच्या झग्याला पाठीमागे जमिनीवर लोळणारा फूट-दीडफूट असा झुलीचाच डौलदार पिसारा होता. एखादं आवडतं मांजर किंवा लाडकं लहान मूल पायात घोटाळत रहावं तसा हा पिसारा त्या थयथयत्या पायात घोळत राहिला आणि या परिसीमेच्या अंकातला सारा संवाद या पिसाऱ्याभोवती फिरत राहिला. कधी ती त्याला रागे भरे; कधी त्याच्यावर वैतागे; कधी प्रेमाने चुचकारी; कधी त्याला लडिवाळपणे उचलून कुरवाळी, जवळ घेई; तर कधी त्याला अतिदुःखाने कवटाळून उसासे; तिचा तडफडाट होई. भाषेचा गंधही नसल्यामुळे ते लाडकं बाळ होतं की प्रीतीची याचना करणारा दीन प्रेमिक होता ते समजलं नाही. पण तो तासभर आमची मनंसुध्दा त्या पिसाऱ्यावर झुलली आणि भुलली हे नक्की. नाचाच्या ठेक्यावर आम्हा सगळ्यांचे हात कधी टाळ्या वाजवायला लागले आणि ताल बदलला तरी कसे बिनचूक वाजवत राहिले हे कळलंसुध्दा नाही.



एक उत्कट पवित्रा



पायघोळ झूल

## ऐरणीच्या ठेक्यासवे बांध फुटे स्फुंदनाचा

आन्दालुशियामधल्या मुस्लिम, ज्यू आणि जिप्सी जमाती वेळोवेळी वेगवेगळ्या राजवटींच्या दुष्टचक्रात भरडल्या गेल्या; दऱ्याखोऱ्यात हद्दपार केल्या गेल्या. या गांजलेल्या माणसांच्या मनात उचंबळून येणाऱ्या भावनांची गाणी झाली. या गाण्यांना ताल होता लोहाराच्या ऐरणीवरच्या घणाघाताचा किंवा लाकडी जमिनीवर आपटलेल्या काठीचा. अतीव दुःखाने भरलेली, मृत्यूच्या सावटाने झाकोळलेली ही ऐरणीवरची गाणी जात्यावरच्या ओव्यांसारखीच उत्स्फूर्त होती. साचलेल्या दुःखाचा बांध फुटावा म्हणून गायलेली ती स्वगतं होती. त्यांना श्रोते असलेच तर ते कुटुंबातलेच, निकटचे, समदुःखी आणि तसेच असहाय्य. गाणं म्हणणाऱ्यांना या श्रोत्यांकडून समदुःखभावाखेरीज कसलीही अपेक्षा नव्हती. कसलाही गवगवा तर नकोच होता. त्यामुळे या गाण्यात हिस्टेरिया, मेलोड्रामा, आक्रस्ताळेपणा यांना वाव नाही. अत्यंत उत्कट आणि तरीही अत्यंत संयत अशी ही गाणी होती. भारतातून, मनात कथ्थक बाळगून, आलेल्या जिप्सींनी या गाण्यांवर नृत्याचं कलम केलं. आणि फ्लॅमेंको जन्मला. नंतरच्या शतकांत दुःखच नव्हे तर कुठलीही उत्कट भावना फ्लॅमेंकोवाटे व्यक्त होऊ लागली.

दंडुकेशाही, उपासमार चालूच राहिली. अठराव्या शतकात, पोटाची खळगी भरण्यासाठी जिप्सींनी हे नाचगाणं छोट्याछोट्या गावात आणलं. स्वप्नाळू लेखकांनी हे आपल्या कथा-कादंबऱ्या-कवितांत वापरलं आणि ऐयाशी श्रीमंतांनी त्याला आपल्या रंगमहालात खेचलं. कधी पोटासाठी तर कधी लोभी राज्यकर्त्यांच्या हुकुमापायी या फ्लॅमेंकोला कॅबेरेचा साज चढवला गेला. या मुक्त स्वच्छंदी पाखरांचे आर्त मनस्वी सूर रंगेल सरदारांच्या तालावर नाचेनात. मग त्यांच्या ऐवजी आन्दालुशियाची लोकगीतं, Fandangos, गायली गेली, फोफावली. खरा फ्लॅमेंको डोंगरदऱ्यात हरवला. पण कुणी ना कुणी पुण्यात्मा पुढे सरसावला. दऱ्याखोऱ्यात लपलेला खरा फ्लॅमेंको त्याने पुन्हा हुडकून काढला; पुढे आणला. स्पॅनिश सिव्हिल युध्दाच्या वेळी अन्दालुशियात उपासमार झाली; फ्लॅमेंकोचे फड थिएटरात उतरले. १९५० पासून नव्याने अधिक संशोधन सुरू झालं. आजही मोठमोठ्या रंगमंचावर दिमाखदार रंगीबेरंगी ताफ्यांनी सादर केलेला फॅशनेबल फ्लॅमेंको बघायला मिळतो. पण काही ठिकाणी अत्यंत घरगुती वातावरणात, कसल्याही भपक्याशिवाय हे नाचगाणं होतं. ती आर्तता,उत्कटता, ते मृत्यूचं सावट सारं काही या अश्या अनौपचारिक प्रकारातून अधिक जाणवतं.

घरी यायला रविवार पहाटेचे दोन वाजले. हॉटेलात पोचलो तर आमचा पहिल्या दिवशीचा इंग्रजी बोलणारा रिसेप्शनिस्ट दोस्त खाली भेटला. प्रेमाने विचारपूस केलीन्. त्याच्याकडून जे कळलं त्यावरून, इसाबेलाने आम्हाला ज्या खेळाला नेलं होतं तो सादर करणारा वृंद म्हणे बार्सिलोना

गावातला सर्वोत्कृष्ट फ्लॅमेंकोफड होता. आणि Font Magica म्हणजे जादुई कारंज्यांचा तो देखावा एप्रिल महिन्यात पाण्याच्या टंचाईमुळे फक्त शुक्रवार-शनिवारच आणि रात्री आठ वाजता फक्त एकदाच दाखवला जात होता. आम्ही सोमवारी पहाटेच स्पेनहून निघणार होतो! पायीपायी खाली उतरलो नसतो तर......?

## पिंडे पिंडे मतिर्भिन्ना

'अनंतहस्ते कमलावराने ' दान दिलं की काही काळ आपल्या दुबळ्या झोळ्यांवरसुध्दा इंद्रधनुष्यी पुटं चढतात. आमचं असंच झालं. दुसऱ्या दिवशी न्याहरीला जरा उशीराच पोचलो तेव्हा अजूनही हरखलेले आणि काहीसे हरवलेलेच होतो.

तेवढ्यात एक बुजुर्ग प्राध्यापक घाईघाईने न्याहरी उरकून येताना भेटले. हे दर सहा महिन्यांनी कॉन्फरन्सेसच्या निमित्ताने जगभर फिरत असतात. सहज चौकशी केली,
"काल फ्लॅमेंकोला दिसलां नाही. तुम्ही काय, पूर्वीही पाहिला असेल म्हणा."
प्राध्यापकांच्या कपाळावर नाराजीची उभी आठी उमटली.
"मी कॉन्फरन्सला येतो तो शिकायला आणि शिकवायला. नाचगाणी करायला नव्हे."
आमच्याकडे तुच्छतेने पहात ते अध्ययनानंदी डुंबायला निघून गेले.

टेबलावर आमचा एक जुना दोस्त आमच्या शेजारी येऊन बसला. तोसुध्दा फ्लॅमेंकोला नव्हता. त्याला विचारलं तर त्याची वेगळीच तऱ्हा.
"अरे यार, त्या सौदी अरेबियात सोमरसाचा एक थेंबही मिळत नाही. चातकासारखा तळमळत असतो मी. जरा बाहेर पडलो की उंटासारखी ढोसून घेतो.नाच बघायला कोणाला सवड आहे इथे? सांग्रिया काय छान लागते! तिथे गहवा पिऊन कंटाळलो. इथली केगमधली कावा पितोय्. जिभेवर गोल गुळगुळीत फिरत फिरत काय चढते म्हणून सांगू! न मिळे अशी संधी पुन्हा झिंगण्या नरा!"

"हाय उगवला, सलाम आलेकुम. काय काय खरेदी केलीस? मी कालचा दिवसभर शॉपिंग केलं. काय छान शूज मिळालेत मला! आणि ज्युवेलरी बघशील तर थक्कच होशील. ड्रेसेस सुध्दा बरेच घेतले मी. आता ब्रिटिश एअरवेजने माझं जास्तीचं वजन सोडलं पाहिजे. नाहीतर उगाच भुर्दंड!", दोन्या, म्हणजे दुनिया-अवनी-धरित्री, चार टेबलांपलीकडून अत्यानंदाने ओरडून बोलत होती. आजूबाजूच्या वळलेल्या नजरांचं तिला काऽऽही सोयरसुतक नव्हतं.
"तू कायकाय घेतलंस ग, उग्गावाला?"
माझ्या नावाची 'उगवला', आगवाला', 'एगवाला', 'गावाला'... अशी सहस्रनामावली करायची तिला

हौस आहे.
"मी आज करणार आहे शॉपिंग",
मी थाप मारली.
"काऽय गऽ इग्गावालाऽ, आज रविवार आहे. आज सगळं मार्केट बंद. कुणाकुणाच्या घरी जाशील खरेदीला? कालपर्यंत झोपली होतीस का? की गेली होतीस कुठे फ्लॅमेंकोबिमेंकोला?"
दोन्याला माझ्या मंदबुध्दीची खरोखरच कीव आली. पण ही मैत्रीण मोठी कामाची आहे.
"दोन्या, अगऽ माझ्या सासूबाईंनी स्पेनहून केशर आणायला सांगितलं होतं. आता ग?"
"घाबरू नकोस. मी शंभर डब्या घेतल्या आहेत परवाच. तुला किती वीसपंचवीस पुरतील?"
"फार तर पाच लागतील मला",
हे सांगताना मी भयंकर ओशाळले.

प्रश्न फक्त केशराचा नव्हता. मी भटकभवानीसारखी फिरत होते. काहीच खरेदी केली नव्हती. निदान जवळच्या चारपाच माणसांसाठी तरी काही भेटी न्यायला हव्या होत्या. तसेच तडक शेजारच्या, युरोपमधल्या सर्वात मोठ्या मॉलमध्ये गेलो. तिथे फक्त खाऊचे धक्के उघडे होते. बाकी सारं चिडीचूप. मग धावत धावत प्लासा काटालून्याला गेलो. मुख्य माहितीकेंद्र उघडं होतं आणि त्यांच्याकडे छोट्याछोट्या स्मरणवस्तू मिळत होत्या. नवऱ्याला त्या मुळीच पसंत पडेनात. दूरदृष्टीने, लहान मुलासारखा हट्ट घेत, "हे मला स्वतःसाठीच हवंय", म्हणत मी बराच हावरटपणा केला. मनातल्या मनात माणसं आठवत जमतील तेवढ्या वस्तू पदरात पाडून घेतल्या.

## ममममम-ततपप

माहितीकेंद्रातल्या काउंटरवरच्या बाईने सांगितलं की कोलंबसाच्या पुतळ्यापाशी एक मोठ्ठं शॉपिंग सेन्टर आहे. ते रविवारीसुध्दा उघडं असतं. त्याचं तिने जे नाव सांगितलं ते आम्हाला पटकन कळेना. काहीतरी 'ममममम' येवढच कळलं. लिहून मागितलं तर ती म्हणाली," ते येवढं मोठं आहे की तुम्हाला सरळ दिसेलच." मी कोलंबसाला काही कमी प्रदक्षिणा घातल्या नव्हत्या. मला काही ते सरळ, आडवं, तिडवं, कसंही दिसल्याचं आठवेना. तरी हुज्जत न घालता कोलंबसाच्या पदकमलांशी पोचलो. तिघाचौघांना खाणाखुणा करून शॉपिंग सेन्टर विचारलं. एकाला तुटपुंजं इंग्रजी येत होतं. तो म्हणाला,"नाव काय?" आम्ही 'ममममम' चं ततपप केलं. त्याने उत्साहाने एका भल्यामोठ्या इमारतीकडे बोट दाखवलं, "हेच ते". पण तो तर मॅरिटाईम म्यूझियम होता. त्यातून तोही आज बंदच होता. मग त्याचा नाद सोडून  आमचे आम्हीच डोळे उघडून बघायला लागलो. काहीच दिसेना.

## भूमध्य सागरातला लकडी पूल

मी टॉयलेटसाठी एका रेस्टॉरंटमध्ये शिरले. शेजारच्या टॉयलेट्मधून आवाज आला," Mummy, are you there?" वाघिणीचं दूध इतकं गोड कधीच लागलं नव्हतं. मी त्या 'ममी'ला पकडून माहिती विचारली. तिने अगदी वाट वाकडी करून मला 'राम्बला देल मार' म्हणजे समुद्रात सरळ जाणारं ला राम्बलाचं टोक दाखवलं. हा रस्ता म्हणजे एक लांबच लांब कमानदार लाकडी पूल आहे आणि त्याचे तीन भाग होतात. त्यातला मधला भाग बोटी जाण्यासाठी वाट करायला मधूनमधून हालवून बाजूला करतात. यावेळी रेल्वे क्रॉसिंगसारखी दोन्ही बाजूने फाटकं बंद करतात. हा पूल ओलांडून गेलं की पलीकडे Maremagnum नावाचा भला थोरला शॉपिंग मॉल आहे. हाच तो 'मममम'. शिवाय एक मल्टिप्लेक्स आयमॅक्स थिएटर आणि मत्स्यालयही लागतं. आम्ही या मॉलला मम म्हणत त्यात फीर फीर फिरलो. हा बहुतेक बाजार पाश्चात्य पध्दतीच्या तयार कपड्यांचाच आहे. त्याच्यात आमच्या माणसांना रुचतील अश्या वस्तू काही मिळाल्या नाहीत. शेवटी माझ्ा माहितीकेंद्रातला हावरटपणा हाच शहाणपणा ठरला. तिथेच बसून त्या मघाच्या नापसंत वस्तू आणि माणसं यांचा ताळा करून पाहिला. तो जमल्यावर थोडंसं जेवून मॉलबाहेरच्या लाकडी फलाटावर गेलो.

## लाकडी चौपाटी


पोकळ मासा


हसरा लॉब्स्टर

या फलाटाचा स्थनिक लोक चौपाटीसारखा उपयोग करतात. रविवार असल्यामुळे तिथे गर्दी होती. मुलं दुडदुडत होती; त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य देऊन आईबाप गप्पा मारण्यात गुंग होते. शेजारच्या निळ्याभोर पाण्यात हात दीड हात लांबीचे गुबगुबीत मासे सुळसुळत होते आणि त्यांना पाहून तिथे जमलेल्या, अतिपूर्वेकडच्या पाहुण्यांच्या अडजिभा-पडजिभा हुळहुळत होत्या. इथून थेट आमच्या हॉटेलपर्यंत बार्सिलोनाच्या खऱ्या चौपाट्या पसरलेल्या आहेत. त्यांच्यावरचं अनावृत सौंदर्य न्याहाळण्याचा सल्ला आम्हाला दिला गेला होता. आम्ही त्याऐवजी  धातूच्या तारांचा बनलेला एक अजस्र पोकळ मासा पाहिला. शिवाय जवळच एक भला थोरला हसरा लॉब्स्टर आहे. हासुध्दा पोकळ आहे आणि त्याच्या पोटात मस्तपैकी घसरगुंडी दडलेली आहे. त्यानंतर मात्र घरी जावंच लागलं. बार्सिलोनातली कित्येक प्रेक्षणीय ठिकाणं पहायची राहूनच गेली होती. पण आता वेळ संपला होता. अजून सामान भरायचं होतं.

थोडी डुलकीही काढायची होती.

रात्री हॉटेल सोडताना बिल विचारलं. माझ्या राहण्याचे रोजचे सत्तर यूरो म्हणजे एकूण तीनशे पन्नास यूरो आणि मिनिबारमधल्या पाण्याचे वर थोडे असे व्हायला हवे होते. पण बिल फक्त पाच यूरो एवढंच आलं, फक्त पाण्याचं बिल. मी नवऱ्याची पाहुणी फुकटातच सुटले.

## निरोप

हे बार्सिलोना शहर अजब आहे. आभासांच्या जगात जगणारा डॉन क्विक्झोट, पश्चिमेकडे जाऊन पूर्व गाठायचं, पृथ्वीप्रदक्षिणेचं धाडस करू पाहणारा कोलंबस, भन्नाट भ्रमचित्रं दिसावी आणि चितारता यावी म्हणून अंमली पदार्थ घेणारा साल्वाडोर डाली, लहान मूल जसं खेळणं मोडून पुन्हा वेडंवाकडं जुळवतं तशी नैसर्गिक रूपं वेडीवाकडी जोडून रेखाटणारा पिकासो आणि तसाच त्याचा चेला मायरो, निसर्गाचा एकलव्य गावडी, सारं स्पेन एका मोहल्ल्यात एकवटू पाहणारे ते चौघे स्थापत्यविशारद, हे आणि असे आणखीही बरेच वेडे पीर या गावाने जपले. त्यांच्या वेडेपणाचं कौतुक केलं. त्यांना अधिक वाव आणि प्रसिध्दी मिळावी म्हणून वेळोवेळी उदंड पदरमोड करून जत्रा भरवल्या. हळूहळू हा सारा गावच एक अखंड चालणारी अद्‌भुत जत्रा बनला. या जत्रेत तऱ्हेतऱ्हेचं सूप पिता येतं. पण या जत्रेचं सूप कधी वाजत नाही. वाजूही नये. प्लासा काटालून्याजवळच्या एका कारंज्याचं पाणी म्हणे जादूचं आहे. जो ते पाणी पितो तो कायमचा बार्सिलोनावासी होतो. मी निग्रहाने ते पाणी प्याले नाही. पण माझ्या मनाने मात्र त्या पाण्याची चव जरूर घेतली. अजून तिथेच रेंगाळतंय्. वेडं कुठलं!

- उज्ज्वला दळवी

१६ जुलै २००७